Impact Factor - 6.261

ISSN - 2348-7143

INTERN!TION!L RESE!RCH FELLOWS !SSOCI!TION'S

# RESEARCH JOURNEY

## Multidisciplinary International E research Journal

November -2018

SPECIAL ISSUE-LXXIII,( B)

# Samiksha






**Executive Editor:**
Prof. Virag Gawande
Director,
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Guest Editor**
Dr.Sanjay j. Kothari
Dr. Dinesh W. Nichit

**Chief Editor**
Mr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal* | ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 6.261, (GIF) –0.676 (2013)
Special Issue : Samiksha | November 2018
UGC Approved No. 40705

## INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | किशोरवयीन मुलींच्या आहारविषयक समस्या आणि उपाययोजना एक अध्ययन | प्रा. डॉ. सौ. माधुरी अरविंद देशमुख | 5 |
| 2 | समकालीन भारतीय लोकशाहीतील महिलांचा राजकीय सहभाग | प्रा. डॉ. संदीप भि. काळे | 8 |
| 3 | वैश्विक तापमान वाढीचा पर्यावरणावरील प्रभाव | डॉ. मनोज गाथे | 12 |
| 4 | भारतातील लोकसंख्येची समस्या | प्रा.डॉ.एस.एम.गावडे | 15 |
| 5 | कृषी प्रधान भारतातील शेती आणि जलधोरण : एक शोकांतीका | डॉ.प्रा.केशव सुर्यभान गुल्हाने | 21 |
| 6 | आर्थिक सुधारणा काळापासून भारतीय रुपयाची घसरण एक अभ्यास | प्रा. श्रीमती नेरे अरुणा वि. | 24 |
| 7 | सुरेश भटांचा गझल विचार | डॉ. प्रशांत सुनील शेळके | 27 |
| 8 | वृध्दांच्या पालनपोषणात नवपिढीचे उत्तरदायित्व | प्रा. डॉ. महेन्द्र वासेकर | 33 |
| 9 | भारतातील धर्मनिरपेक्षता : तत्त्व आणि व्यवहार | प्रा.डॉ.माधव केरबा वाघमारे | 37 |
| 10 | आत्मकथा:सत्याचे एक भिन्न रूप | प्रा.डॉ.बाबाराव मारोती ठावरी | 40 |
| 11 | भुलाबाईच्या गाण्यातील समाजजीवन | प्रा. डॉ. अनुराधा रामकृष्ण मुळे | 45 |
| 12 | वर्धा जिल्हयामधील किशोरावस्थेतील मूलींच्या समस्या:एक अध्ययन | प्रा. डॉ. अंजली हूमने | 48 |
| 13 | मेळघाट प्रदेशातील सामाजिक व सांस्कृतिक संरचना — भौगोलिक विश्लेषण | डॉ. प्रमोद बावणे | 53 |
| 14 | महात्मा गांधीच्या विचारांची प्रासंगिकता | प्रा.सौ.सुहास चं. नागापूर/शिवणकर | 59 |
| 15 | भारतीय लहान मुलांचे पोषण आणि आरोग्य | प्रा. डॉ. सौ. अनिता एन. सोनुले | 65 |
| 16 | अर्थतज्ज्ञ लोकमान्य टिळक | डॉ. देवेंद्र रंगाचार्य | 68 |
| 17 | भारतीय कुटुंब पध्दतीचे बदलते स्वरूप आणि परिणाम | प्रा.सौ.वासंती देवनाथा खाडिलकर/देवीकर | 71 |
| 18 | लोकप्रशासनावर माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव. | प्रा.डॉ.प्रदिप हिम्मतराव बारड | 77 |
| 19 | सामाजिक वातावरण आणि बालसमस्यांचे वास्तव्य | डॉ. कमलकिशोर बा. इंगोले | 80 |
| 20 | संतांचे कर्तृत्त्व व समाज : काल आणि आज | प्रा. डॉ.सौ.उज्ज्वला पाटील | 84 |
| 21 | महाराष्ट्रातील जिल्हानिहाय शहरी व ग्रामीण भागातील लिंगगुणोत्तर प्रमाणाचे तुलनात्मक भौगोलीक अध्ययन | प्रा. एन. जी. सोनुले | 89 |
| 22 | शारीरिक शिक्षण आणि मानवी जीवनात खेळांचे महत्व | प्रा.उमेश स व्यास | 94 |
| 23 | भारतीय पर्यटन उद्योगाचा विकास | प्रा.डॉ.मनिषकुमार का. कायरकर | 98 |
| 24 | ईस्ट इंडिया कंपनी व भारतीय अर्थव्यवस्था | प्रा. डॉ. एन.बी मठपती | 105 |
| 25 | विज वितरण आणि ग्राहक संरक्षण : बुलडाणा जिल्हाचा विशेष अभ्यास. | प्रा.डॉ.कु .सुनिता कलाखे | 110 |
| 26 | ग्राहक सरंक्षण कायदा 1986 (दुरूस्त विधेयक 2002) | प्रा.डॉ. एस. आर. बखळे | 114 |
| 27 | मानुषतेचा सिद्धान्त | प्रा. डॉ. विजय रैवतकर | 118 |
| 28 | इंटरनेट बॅकींगचा अधिकोश व्यवहारात प्रभाव | प्रा. संजय यु. उल्हे | 123 |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 6.261, (GIF) –0.676 (2013)
Special Issue : Samiksha
UGC Approved No. 40705
ISSN : 2348-7143
November 2018

# इंटरनेट बॅकीगचा अधिकोश व्यवहारात प्रभाव

प्रा. संजय यु. उल्हे
वाणिज्य विभाग, श्री पुंडलिक महाराज महाविद्यालय, नांदुरा(रेल्वे)

**प्रस्तावना :—**

इंटरनेटमुळे आपले जीवनमान व कार्यपध्दती पुर्णपणे बदलेली आहे. ग्प्रहकांच्या वस्तुची खरेदी इंटरनेट वरुनच बॅकीगचे व्यवहार हया बाबी लोकप्रिय झालेल्या आहे. ग्राहकांच्या प्रोत्साहनामुळे इलेक्ट्रॉनिक व्यापार अतिशिय लोकप्रिय होत आहे. व झपाटयाने विकास होत आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या जागतिक स्पर्धेत अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या बॅक व्यवसायात संगणीकरण अनिवार्य झाले आहे. ग्राहकांना अधिकाधिक सेवा पुरविण्याची जबाबदारी बॅकेवर येते. इलेक्टॉनिक व्यापाराबरोबरच इंटरनेटवर बॅकीगही आपला पाय घटट रोवीत आहे. देशातील व विदेशातील अनेक बॅका इंटरनेटवर आपली स्वतःची संकेतस्थळे निर्माण करीत आहे. आणि त्यांच्या मार्फत इंटरनेटवरील ग्राहकांना बॅकीग च्या सेवा उपलब्ध करुन देत आहे. पारंपारिक बॅकीग पध्दतीच्याच तत्वांना अनुसरुन ई—बॅकीग ही कार्यपध्दती ठेवलेली असली तरीही पण अनेक बाबतील नावीनय निर्माण केले आहे. नेहमीच्या बॅकीग पध्दती प्रमाणे ग्राहकाला बॅकेत जावुन तासनतास रांगेत उभे राहण्याची गरज नाही त्यांची ही सोय ए.टी.एम. ने दुर केली. वर्षातील 365 दिवस व दिवसाचे 24 तास ग्राहकांना आपल्या खात्यातुन पैसे काढता यावे आणि ते देशाच्या कोणत्याही कानाकोपा—यातुन हयासाठी इंटरनेट बॅकीग ची सुविधा सुरु करुन दिली आहे. इंटरनेटमुळे बॅकीग क्षेत्रात मुलभुत बदल झाले असुन ग्राहकांकडे या व्यवहाराची सुत्रे गेली आहेत. त्यामुळे त्यांच्याकडुन उच्च दर्जाची बॅकीग सेवांची मागणी होत आहे. बॅकानीही आता एटीएम, टेलीबॅकीग, इंटरनेट बॅकीग, मोबाईलबॅकीग, केडीटकार्ड, डेबीटकार्ड या सारख्या सेवा प्रदान करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे ऑनलाईन बॅकीग सुविधा इंटरनेटमुळे लोकप्रिय झाली. वित्तीय क्षेत्रातील नियम शिथील केल्यामुळे अनेक नविन संधी चालुन आल्या आहेत. परंतु त्यामुळे जोखीमही वाढल्या आहेत. या जोखीमेवर इंटरनेटवर आधारित आपली व्यवस्थापन यंत्रणा राबविण्यास सुरुवात केली आहे. वित्तीय व्यवहारांना नवीन रुप देण्यात इंटरनेटने एक महत्वाची भुमिका बजावली आहे. त्यामुळे बॅकीग व्यवहारात मुलभुत बदल झाले आहे.

**ऑनलाईन बॅकीग व्दारे ग्राहकांना देण्यात येणा—या सेवा :—**

1. ग्राहकांना आपल्या खात्यातील शिल्लक तसेच रकमेचे विवरण अगदी काही मिनिटातच ऑनलाईन बॅकीग मुळे शक्य होते.
2. रकमेचे विवरण देतांना नावे व जमा टाकलेली रक्कमे बदलाची माहिती देण्यात येते.
3. बिलाच्या रकमेचे ऑनलाईन शोधन करुन रकमेचे स्थानांतरण करणे, शोधन करण्यात आलेल्या रकमेचे समायोजन करणे हया बाबीची सुध्दा सोय उपलब्ध करुन देण्यात येते.
4. आदेश नावे टाकन्यात आलेल्या रकमेबाबत योग्य वृत्ती करणे.
5. बॅकेच्या सर्व शाखा दुरध्वनीव्दारे एकमेकांना जोडल्या जातात. त्यामुळे ग्राहकांना कोणत्याही शाखेतुन कोणत्याही शाखेचा व्यवहार करता येतो.

ऑनलाईन बॅकीग व्दारे वरील सेवा उपलब्ध कररुन देत असतांना मात्र ऑन लाईन बॅकीगव्दारे प्रत्यक्षात रक्कम स्विकारणे आणि रक्कम देणे ही महत्वाची सेवा उपलब्ध करुन दिल्या जात नाही.

**ऑनलाईन बॅकींगचे बॅकींग क्षेत्रात फायदे :–**

**१. सोईस्कर :–**

पारंपारिक बॅक कार्यालयाप्रमाणेच ऑनलाईन बॅकीगच्या बेबसाईटस कधीही बंद होत नाही. त्या दिवसातुन 24 तास सुरु असतात. यामुळे ग्राहकाला बॅकीग संदर्भातील कार्य केव्हाही करता येते. यामध्ये वेळेचे बंधन नाही. ग्राहकाला व्यवहारासाठी बॅकेच्या कार्यालयात जाण्याची गरज भासत नाही. तर घर बसल्या बॅकीगचे सर्व कार्य करु शकता येते.

२. विश्वव्यापकता :–

ऑनलाईन बॅकीग ही संकल्पना विश्वव्यापी आहे. यामध्ये एक गाव, एक राज्य, एक देश, व्यापलेला नसुन सर्व जग व्यापलेले आहे. त्यामुळे जगातील कोणत्याही बॅकेचे कार्य करण्यास वर्ल्ड वाईड वेब च्या सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे ग्राहक ई बॅकीगच्या सोयीचा फायदा घेवु शकतो. यामध्ये ग्राहकाला भौतिक व राजकीय बाधा उत्पन्न होत नाही. तर बॅकीग बददल असलेल्या सेवा जगात कुठेही उपलब्ध करुन घेवु शकतो. फक्त बॅकेच्या वेबसाईटचा उपयोग केल्यास तात्काळ बॅकेशी व्यवहार करता येईल.

**३. जलद व्यवहार क्रिया :–**

इंटरनेटमुळे बॅकीग व्यवहार हा जलद गतीने होण्यास मदत होते ऑनलाईन बॅकीगच्या वेबसाईटस सामान्यतः ए.टी.एम. च्या कार्यप्रणालीपेक्षा लवकर आणि खात्रीशिरपणे उघडतात. त्यामुळे ग्राहकाला आपले व्यवहार अगदी जलद गतीने करता येतात. बॅकेची वेबसाईटस उघडल्याबरोबर ग्राहक बॅकीगची कार्य सहजपणे व लवकरात लवकर करु शकतो.

**४. कार्यक्षमता :–**

इंटरनेटमुळे ग्राहक एका ठिकाणी बसुन बॅकीग विषयक कार्यक्षमतेने आणि जलद गतीने करु शकतो. ग्राहक बॅकविषयक कार्यासोबतच Compulsory Deposit Scheme प्रतिभुती विषयक कार्यसुध्दा तो सुरक्षित अशा वेबसाईटस वरुन करु शकतो. यामुळे ग्राहक घरबसल्याच बॅकीग विषयीची कामे करतो. त्याला बॅकीग कामासाठी बाहेर जावे लागत नसल्यामुळे तो अधिक कार्यक्षमतेने आपली कार्य करु शकतो.

**५. परिणामकारता :–**

ऑनलाईन बॅकीग क्षेत्राला माहिती तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यामुळे ऑनलाईन बॅकीगच्या साईटस आपल्या ग्राहकांना खात्यांचे एकत्रिकरण आणि समाशोधन, स्कंद विपनीतील स्कंधाचे मुल्य, बाजार भाव आणि ग्राहकांच्या संपत्तीबाबत मुल्यविषयक माहिती इ. बददल परिणामकारक अशा उत्कृष्ट सोयी पुरवित असतात. ब–याच वेबसाईट तर आपल्या ग्राहकांना पैशा विषयी सुध्दा विविध बाबतीत मार्गदर्शक करीत असतात. त्यामुळे ग्राहक आपल्या पैशाचा योग्य विनियोग करु शकेल.

**६. बॅकीग शाखावर नियंत्रण :–**

इंटरनेटमुळे ग्राहकांना ए.टी.एम. कार्डस, डेबीट कार्डस, स्मार्ट कार्ड इ. कार्ड सेवांचा उपयोग करुन वस्तुची खरेदी विकी आणि आर्थिक व्यवहार करता येतात. त्याच अधिकोष मुख्य कार्यालय आपल्या इतर शाखावर नियंत्रण ठेवुन त्यांचे आर्थिक व्यवहार दररोज तपासुन त्वरीत त्यांना त्या विषयी मार्गदर्शन करुन कार्यपध्दतीत सुधारणा घडवुन आणु शकते.

७. आधुनिक पध्दतीचा लाभ :—

इंटरनेटमुळे देशातील तसेच विदेशातील बॅक इंटरनेटच्या माध्यमातुन सतत संपर्कात राहु शकते. तसेच ग्राहकांना योग्य सेवा प्रदान करुन आपलाही आर्थिक फायदा करुन घेता येते. यामध्ये आधुनिक पध्दती दररोज सुधारित असल्यामुले बॅकीग व्यवहार हा पारदर्शक तसेच ग्राहक व बॅकीग क्षेत्राला अधिक लाभदायक ठरतो.

**ऑनलाईन बॅकीगच्या मर्यादा :—**

**१. खाते उघडण्यास विलंब :—**

ऑनलाईन बॅकीग क्षेत्रास माहिती तंत्रज्ञान आले परंतु ऑनलाईन बॅकीगचे फायदे घेण्यासाठी ग्राहकांना एक अर्ज बॅकेकडे करावा लागतो. त्यानंतर बॅक त्याला एक आयडी आणि पासवर्ड देते. या प्रकियेला बराचसा कालावधी लागतो. त्यामुळे ग्राहकाचा वेळ आणि कार्यक्षमता वाया जाते.

**२. समजन्यास कठीण :—**

ग्रामीण भागातील बॅकेच्या शाखेत जावुन व्यवहार करण्याइतपत ही पध्दती आणि सोपी नाही कारण ही ऑनलाईन बॅकीग पध्दती समजावुन घेणे आवश्यक आहे. व ती समजण्यास सोपी व सरळ नाही. यामध्ये संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे तसेच इंटरनेट उघडणे आवश्यक त्यामुळे ही पध्दती ग्रामीण भागातील सर्वच लोकांना समजेल ऐवढी सोपी नाही.

**३. बॅकेच्या वेबसाईटस मध्ये परिवर्तने :—**

लहान मोठया सर्वच बॅका वेळोवेळी आपल्या वेबसाईटस मध्ये नवीनीकरण आणण्यास प्रयत्न करीत असतात. त्यामुळे बॅकेच्या वेबसाईटस मध्ये परीवर्तन होत असतात. केलेली परिवर्तने सर्वानाच समजेल असे म्हणता येणार नाही.

RESEARCHJOURNEY

**४. ग्राहकांच्या मनातील भिती :—**

ऑनलाईन बॅकीगच्या उपयोगाबाबत लोकांच्या मनात एक प्रकारची भिती निर्माण झालेली आहे. व्यवहारासाठी मशीनचा वापर सर्वानाच सोयीचा असतो असे नाही. त्यात चुका होण्याची भिती व झालेल्या चुकामुळे ग्राहकाच्या उडालेला गोंधळ यामुळे ग्राहकाला पुन्हा व्यवहार करणे भितीदायक वाटते.

**निष्कर्श :—**

भारतामध्ये इतर देशाच्या तुलनेत इंटरनेटचा विकास झालेला नाही हयाला अनेक कारणे आहेत. असे असले तरीही ही कारणे हळुहळु दुर होत आहेत. भारतातील व्यक्तीला इंटरनेरच्या माध्यमातुन ऑनलाईन बॅकिग च्या सेवा पुरवित आहे. बॅकेचे व्यवहार, इलेक्ट्रॅानिक मनी, अधिकोषातील आपल्या खात्याचे विवरण, रकमाचे समायोजन, खात्यांचे समाशोधन, बॅकेच्या शाखेत खाते उघडणे, चेकने व्यवहार करणे, कर्जासाठी अर्ज करणे, ऑनलाईन आवश्यक ते कागदपत्रे प्राप्त करणे भारतातील स्कंध्द विपणी संदर्भात व्यवहार करणे इतर देशाच्या देशांच्या तुलनेत भारतात पुरविण्यात येणा—या ऑनलाईन सेवांची संख्या कमी आहे. परंतु भारतात ज्या प्रमाणात इंटरनेटच्या माध्यमातुन ऑनलाईन बॅकीग सेवान मध्ये वाढ होत आहे. याचा विचार करता असे म्हणता येईल की इंटरनेटमुळे अधिकोष व्यवहाराचे भवितव्य उज्वल आहे.

**संदर्भ ग्रंथ :—**

1. ईकॉमर्सची मुलतत्वे :. एस. एम. कोलते
2. ईकॉमर्सची मुलभुत सिध्दांत :— निता फडवणीस
3. इलेक्ट्रॉनिक माहिती साधने : शरद भट